नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
निशाणी ६३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ७ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव – संतोष दत्ताराम गोसावी
वय – ५६ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
नेमणूक–पोलीस मुख्यालय ओरोस, हुद्दा–पोलीस उपनिरीक्षक

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–</u>**

गु.नों.क्र.४६/२०१७ हा दि. ०१/०४/२०१७ रोजी वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, १९८४ कलम ३(२)(क) व ७ प्रमाणे दाखल झाला. सदर गुन्ह्याचे तपासकाम मी स्वत: केले. आम्ही स्वत: दि. ०२/०४/२०१७ रोजी गुन्ह्याचा घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा केला. सदर घटनास्थळी दोन पंच नामे अनिल राणे व अमोल कुंभार हजर होते. पंचनामा करतेवेळी आरवली येथील वेतोबा मंदिर जवळील सार्वजनिक शौचालय या इमारतीचा काही भाग तोडलेला दिसून आला. घटनास्थळी अस्ताव्यस्त साहित्य टाकलेले दिसून आले. त्यानंतर मी वस्तुस्थितीनुसार पंचनामा करुन घटनास्थळ पंचनाम्यावर दोन पंचाच्या सह्या घेतल्या. (साक्षीदाराला नि.२७ येथील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) हा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यानंतर दि. ०३/०४/२०१७ रोजी सदर कामातील साक्षीदार मधुसुदन सुतार मेस्त्री, जयवंत राय, सावळाराम टाक्कर यांच्याकडे तपास करुन त्यांची टिपणे नोंदविली.

०२. त्यानंतर माझी बदली झाल्याने मी तपासकाम पोलीस हवालदार श्री. भिसे यांच्याकडे वर्ग केले. त्यानंतर पुढील सर्व तपासकाम पोलीस हेडकॉन्स्टेबल श्री.भिसे यांनी केले व तपासाअंती आरोपींनी गुन्हा केलेबाबत सबळ पुरावा मिळून आल्याने पोलीस हवालदार श्री.भिसे यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर दोषारोपपत्रावर पोलीस हवालदार श्री. भिसे यांची सही आहे. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी क्र. १ याच्या व्यतिरिक्त सर्व आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचेतर्फे सुरु –</u>**

०३. मी शिरोडा येथे घटनेच्या पुर्वी दोन वर्षे कार्यरत होतो. मात्र देवस्थानाबाबत काही वाद असतील याबाबत मला काही माहिती नव्हती. माझी तपासाची सुरुवात प्रथम खबरी अहवाल वाचून झाली. हे म्हणणे खरे आहे की सदर प्रथम खबरी अहवालामध्ये कोणत्याही आरोपीचे नाव

नमूद नव्हते. फिर्यादी हेमंत विष्णू दामोदरे व रविंद्र घाडगे यांनी प्रत्यक्ष घटना पाहिली किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. (साक्षीदाराला प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला.) मी प्रथम खबरी अहवाल पाहून सांगतो की हेमंत दामोदरे यांना घटनेची प्रत्यक्ष माहिती नव्हती. तसेच रविंद्र शिवाजी घाडगे यांना प्रत्यक्ष घटनेची सविस्तर माहिती नव्हती असे मी कागदपत्रे पाहून सांगतो. हे म्हणणे खरे आहे की घटनेची जागा दाखविणारे शाखा अभियंता रविंद्र शिवाजी घाडगे यांना घटनेची माहिती नव्हती. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी घटनास्थळी आरोपींबाबत कोणतीही आक्षेपार्ह वस्तू घटनास्थळी आढळून आली नाही. मधुसुदन मेस्त्री, जयवंत राय व सावळाराम टाक्कर यांनी आपल्या जबाबात घटना नेमकी किती तारखेला झाली ही तारीख सांगितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर कामी कोणतेही हत्यार किंवा मशिन याकामी जप्त केलेले नाही. घटनास्थळ पंचनामा करतेवेळी इमारत कोणाच्या मालकीच्या जमिनीत होती याची मी खात्री केली नाही. तसेच माझ्या तपासकामी सदर शौचालयाच्या टाकीचे मलमूत्र कोणत्या ठिकाणी विसर्जित होते किंवा शोषखड्डा कोणाच्या मालकीच्या जागी होता याची मी खात्री केली नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर इमारतीचा कधीही उपयोग न झाल्याने पाळापाचोळा व घाण साठून सदर इमारत बंद स्थितीत होती. हे म्हणणे खरे आहे की तथाकथीत गुन्ह्यातील फिर्याद ही तीन वर्षांनंतर दाखल झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर फिर्याद ही तीन वर्षांनी दाखल झाली असल्याने प्रथम खबरी अहवाल दाखल होण्यापुर्वी तपासकामात तीन वर्षांत काय घटना घडल्या याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीस पाटील व आरोपी यांची वाकडीक असल्यामुळे पोलीस पाटील मधुसुदन मेस्त्री यांच्या दबावाखाली येवून मी खोडसाळ टिपणे नोंदविली. हे म्हणणे खरे नाही की माझे सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे तपासकाम केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

दिनांक- २३/०१/२०२५

(डी.वाय.रायरीकर)

न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.